**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक 02.6.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 86 - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन 2022-23 करिता सर्वसाधारण सभेची मंजुरी प्रदान करणेबाबत.**

**ठराव क्रमांक 86 -** जिल्हानियोजन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय , अमरावती यांचेकडुन सन 2022-23 करिता अमरावती महानगरपालिकेस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत रु. 10.00 कोटी अनुदान मंजुर आहे.

त्यानुसार विकास कामांचे झोन अंतर्गत आराखडे तयार केलेले आहेत.त्या दृष्टीकोणातून कामे सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ मध्ये नमुद केलेले आहे.अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता यांचेकडून तांत्रिक मंजुरी घेवून ससंनर विभाग यांचेकडुन नकाशे मंजुर करुन सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालयाकडुन प्रमाणित करुन परिपूर्ण प्रस्ताव जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचेकडे प्रशासकीय मान्यते करीता सादर करण्यात येतील.

वरील प्रमाणे मंजुर अनुदानाचे प्रस्ताव सादर करतांना पुर्वाभाव नुसार कमी देयकाची प्राप्त होणा-या निविदेमुळे होणारी बचत लक्षात घेता सोबत जोडलेल्या यादीनुसार एकुण 53 कामांचे अंदाजपत्रकीय रक्क्म रु.12.48 कोटीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. यादी सोबत जोडलेली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.